जनसंपर्क कक्ष
20 JUN 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना मिळणार ऑनलाईन प्रोव्हिजनल डिग्री सर्टीफिकेट



- विद्यापीठाने तयार केली स्वत:ची संगणक प्रणाली
- परीक्षेतील तक्रार नोंद करण्यासाठी ग्रीव्हन्स पोर्टल

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थी पदवी, पदविका तसेच पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. परंतू अद्याप पदवी प्रमाणपत्र स्विकारले नाही, अशा विद्यार्थ्यांना 'ऑनलाईन प्रोव्हिजनल डिग्री सर्टीफिकेट'साठी विद्यापीठाने स्वत:ची संगणक प्रणाली परीक्षा विभागातील आय. टी. सेलने विकसित केली आहे. यासाठी कुलगुरू व प्र–कुलगुरू यांचे मार्गदर्शन लाभले. आवश्यक कागदपत्रे अपलोड करून १३० रूपये पेमेंट गेटवेच्या माध्यमातून भरल्यास संबंधीत विद्यार्थ्यांना त्याच दिवशी 'प्रोव्हीजनल डीग्री सर्टीफिकेट' ऑनलाईन मिळणार आहे. तरी या संधीचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

पदवीनंतर नोकरीकरिता, व्यवसायासाठी विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राची आवश्यकता असते. ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र स्विकारले नाही, त्यांना विद्यापीठातील सबंधित विभागातून प्रत्यक्ष उपस्थित राहून देण्यात येत होते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर लक्षात घेऊन नोकरी किंवा पुढील शिक्षणासाठी परराज्यात, परदेशात असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध केली आहे. या सर्टीफिकेटसाठी पेमेंट गेटवेच्या माध्यमातून १३० रूपये शुल्क भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर विद्यार्थ्यांना त्याचदिवशी सदर पदवी प्रमाणपत्र ऑनलाईन स्वरुपात प्राप्त होणार आहे. या सुविधेचा लाभ जगभराभरातील शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या कोणत्याही महाविद्यालयातील विद्यार्थी घेचू शकतो.

**परीक्षेतील तक्रारीसाठी ग्रीव्हन्स पोर्टल**

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित तिन्ही जिल्ह्यातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भातील शंका, अडचणी, समस्या दूर करण्यासाठी विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही. याकरिता ऑनलाईन 'ग्रीव्हन्स पोर्टल' तयार केले आहे. या सुविधेमार्फत विद्यार्थ्यांना मोबाईल, संगणकाद्वारे नोंद करता येईल. विद्यार्थ्यांच्या समस्या विद्यापीठाला ऑनलाईन स्वरुपात प्राप्त झाल्यानंतर तत्काळ सोडवणूक होण्यास मदत होईल. सुविधेचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
20 JUN 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'प्रोव्हिजनल डिग्री सर्टिफिकेट' विद्यापीठ ऑनलाईन देणार

## परीक्षा मंडळाची सुविधा; विद्यार्थ्यांना दिलासा



"या सुविधांसाठीची संगणक प्रणाली कुलगुरू, प्र-कुलगुरू यांच्या मार्गदर्शनामुळे परीक्षा विभागातील आय. टी. सेल यांनी स्वतः विकसित केली आहे. या दोन्ही सुविधांचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा.

**- डॉ. अजितसिंह जाधव,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

"ऑनलाईन स्वरूपात प्रॉव्हिजनल डिग्री सर्टिफिकेट मिळावी ही मागणी विद्यापीठाकडे केली होती. त्यास प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला याचा आनंद आहे. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. कर्मचाऱ्यांचा ताण कमी होऊन त्यांचा इतर विकासात्मक कामात हातभार लागणार आहे. आर्थिक बचत होणार आहे.

**-अभिषेक मिठारी,** अधिसभा सदस्य

कोल्हापूर, ता. १९ : पदवी, पदविका, पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना आता शिवाजी विद्यापीठ प्रोव्हिजनल डिग्री सर्टिफिकेट (तात्पुरते पदवी प्रमाणपत्र) ऑनलाईन देणार आहेत. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विद्यार्थ्यांसाठी नवी सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांमधून पदवी, पदविका तसेच पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर नोकरीकरिता, व्यवसायासाठी त्यांना पदवी प्रमाणपत्राची आवश्यकता असते. तथापि ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापपावेतो पदवी प्रमाणपत्र स्वीकारलेले नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी प्रोव्हिजनल डिग्री सर्टिफिकेटची तरतूद विद्यापीठाने केली आहे. सध्या हे सर्टिफिकेट विद्यापीठातील संबंधित विभागातून प्रत्यक्ष उपस्थित राहून देण्यात येत होते. या विद्यार्थ्यांना ऑनलाईन सर्टिफिकेट देण्याच्या उद्देशाने परीक्षा मंडळाने संबंधित नवी सुविधा सुरू केली आहे. विद्यार्थ्याने १३० रुपये शुल्क पेमेंट गेटवेद्वारे भरल्यानंतर आणि अपलोड केलेल्या कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर त्याला त्याचदिवशी सर्टिफिकेट ऑनलाईन मिळणार आहे.

विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात असणाऱ्या वेगवेगळ्या शंका, अडचणी, समस्या दूर करण्यासाठी आता विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही. त्यासाठी ऑनलाईन ग्रिव्हेन्स पोर्टल तयार करण्यात आले आहे.

20 JUN 2023
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

शिवाजी विद्यापीठाचा निर्णय : विद्यार्थ्यांचा त्रास वाचणार

# प्रोव्हिजनल डिग्री प्रमाणपत्र आता ऑनलाइन मिळणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पदवी, पदविका तसेच पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पदवी प्रमाणपत्राची गरज भासली की विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठ गाठावे लागत होते. यात विद्यार्थ्यांचा वेळ वाया जायचा; पण शेकडो किमी अंतर कापून विद्यापीठात येण्याचा त्रास वेगळाच. विद्यार्थ्यांची हीच अडचण ओळखून शिवाजी विद्यापीठाने आता प्रोव्हिजनल डिग्री प्रमाणपत्र ऑनलाइन देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठीची ऑनलाइन प्रणाली विद्यापीठाने स्वतः विकसित केली आहे.

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सांगली, सातारा व कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे. विद्यार्थ्यांच्या पुढील व्यवसायासाठी, नोकरीसाठी प्रोव्हिजनल पदवी प्रमाणपत्र विद्यापीठातील संबंधित विभागातून प्रत्यक्ष उपस्थित राहून देण्यात येत होते. सध्याच्या काळातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेऊन तसेच नोकरीच्या तसेच पुढील शिक्षणाच्या निमित्ताने परराज्यात तसेच परदेशात असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा ऑनलाइन स्वरूपात करण्यात आली. हे प्रमाणपत्र ऑनलाइन स्वरूपात मिळण्यासाठी १३० शुल्क भरावे लागणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर विद्यार्थ्यांना त्याचदिवशी हे पदवी प्रमाणपत्र ऑनलाइन स्वरूपात प्राप्त होईल. विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील आयटी सेलने ही प्रणाली स्वतः विकसित केली आहे.

## ग्रिव्हन्स पोर्टलवरून होणार तक्रारींचे निवारण

विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात असणाऱ्या वेगवेगळ्या शंका, अडचणी, समस्या दूर करण्यासाठी विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही. याकरिता ऑनलाइन ग्रिव्हन्स पोर्टल तयार केले आहे. या सुविधेमार्फत विद्यार्थ्यांना तक्रारीची नोंद करता येईल. विद्यापीठाला ऑनलाइन स्वरूपात समस्या प्राप्त झाल्यानंतर तत्काळ सोडवणूक होण्याच्या दृष्टीने मदत होणार आहे. या दोन्ही सुविधांचा लाभ संबंधितांनी घ्यावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले.

## मिठारी यांच्या पाठपुराव्याला यश

प्रोव्हिजनल डिग्री प्रमाणपत्र मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांचा त्रास व वेळ वाया जात होता. त्यामुळे हे प्रमाणपत्र ऑनलाइन द्या, यासाठी विद्यापीठ अधिसभा मंडळाचे सदस्य अभिषेक मिठारी यांनी पाठपुरावा केला होता. विद्यापीठाने त्यांच्या मागणीला प्रतिसाद दिल्याने या पाठपुराव्याला यश आले.



20 JUN 2023

पुढारी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना घरबसल्या मिळणार 'प्रोव्हिजनल डिग्री सर्टिफिकेट'

## शिवाजी विद्यापीठ आयटी सेलकडून अ‍ॅप विकसित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या आयटी सेल पदवी प्रमाणपत्र न स्वीकारलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'प्रोव्हिजनल डिग्री सर्टिफिकेट' मिळवून देण्यासाठी नवीन अ‍ॅप विकसित केले आहे. जगभरातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना घरबसल्या ऑनलाईन प्रमाणपत्र मिळणार आहे. यामुळे शिक्षण, रोजगारासाठी विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी कमी होण्यास मदत होणार आहे.



विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधून पदवी, पदविका व पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर नोकरी, व्यवसायासाठी पदवी प्रमाणपत्राची आवश्यकता असते. व्यवसाय, नोकरीसाठी हे प्रमाणपत्र विद्यापीठातील संबंधित विभागातून प्रत्यक्ष उपस्थित राहून देण्यात येत होते. तथापि, आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि नोकरी, पुढील शिक्षणाच्या निमित्ताने परराज्य, परदेशात असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा सुरू केली आहे. हे प्रमाणपत्र ऑनलाईन स्वरूपात प्राप्त करण्यासाठी आवश्यक शुल्क पेमेंट गेटवे सुविधेने भरल्यानंतर तसेच अपलोड केलेल्या कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर विद्यार्थ्यांना त्याचदिवशी हे पदवी प्रमाणपत्र ऑनलाईन स्वरूपात प्राप्त होणार आहे.

### विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी ऑनलाईन 'ग्रीव्हन्स पोर्टल'

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयामधून येणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात असणाऱ्या वेगवेगळ्या शंका, अडचणी, समस्या दूर करण्यासाठी विद्यापीठात येण्याची आवश्यकता भासणार नाही. याकरिता ऑनलाईन 'ग्रीव्हन्स पोर्टल' अ‍ॅप तयार करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना मोबाईल, संगणकद्वारे अ‍ॅपवर नोंद करता येईल. विद्यार्थ्यांच्या समस्या विद्यापीठाला ऑनलाईन स्वरूपात प्राप्त झाल्यानंतर तत्काळ सोडवणूक होण्याच्या दृष्टीने मदत होणार आहे.

> दीक्षांत समारंभ फेब्रुवारी-मार्च महिन्यात असतो. जूनमध्ये काही विद्यार्थ्यांना गुणपत्रक व पासिंग सर्टिफिकेट विविध कारणांसाठी लागते. आता संगणक प्रणालीद्वारे त्यांना प्रोव्हिजनल डिग्री सर्टिफिकेट मिळेल. तसेच संलग्न महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना ग्रीव्हन्स पोर्टलच्या माध्यमातून तक्रारींचा निपटारा करता येणार आहे.
>
> **- अजितसिंह जाधव,**
> संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ

पुण्यनगरी

# विद्यापीठाकडून मिळणार प्रोव्हिजनल डिग्री

**कोल्हापूर :** पदवी, पदविका तसेच पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर नोकरीसाठी, व्यवसायासाठी विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राची आवश्यकता असते. ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र स्वीकारले नाही अशा विद्यार्थ्यांसाठी 'प्रोव्हिजनल डिग्री सर्टिफिकेट' तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे.

शिवाजी विद्यापीठाशी कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यांतील महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना या सुविधेचा लाभ घेता येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
20 JUN 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

नाकारला होता व्हिसा : जिद्दीने मिळविले यश

# कॅनडातील अन्न सुरक्षा मराठी मुलीच्या हाती

लोकमत विशेष

अशुतोष कस्तुरे
लोकमत न्यूज नेटवर्क

कुंडल (जि. सांगली) : रामानंदनगर (ता. पलूस) येथील मेघा वाईंगडे-शिंदे हिने कॅनडामधील ऑंटारियो प्रांताच्या कृषी आणि ग्रामीण व्यवहार मंत्रालयात अन्न सुरक्षा निरीक्षकपदी नुकताच पदभार स्वीकारला. लग्नानंतर काही तरी नवीन करण्याच्या जिद्दीने, कोणत्याही खर्चिक शिक्षणाशिवाय तिने घेतलेली भरारी वाखाणण्याजोगी ठरली आहे.

रामानंदनगर येथील विजय वाईंगडे यांची मोठी मुलगी मेघाचे बारावीपर्यंतचे शिक्षण किर्लोस्कर विद्यालयात झाले. तिने कोल्हापूर येथील सायबर महाविद्यालयातून फूड टेक्नॉलॉजी मॅनेजमेंटची पदवी पूर्ण केली. त्यानंतर पुण्यात सहा महिने अन्नाच्या नमुन्यांच्या तपासणीचे प्रशिक्षण घेतले. त्याच दरम्यान तिचे लग्न कोल्हापूर येथील रोहन शिंदे यांच्याशी झाले.

पती रोहन मुंबईतील कंपनीत कार्यरत होते; त्याच काळात मेघा तेथील जिममध्ये आहारतज्ज्ञ म्हणून काम करू लागली. सहा महिन्यांनंतर रोहनला कॅनडातील कंपनीत नोकरी मिळाली. मेघाचे शिक्षण अपूर्ण असल्याने तिला कॅनडाला जाणे शक्य नव्हते. पुढे तिने शिवाजी विद्यापीठातून एम.एस्सी. पूर्ण केले. त्यानंतर कॅनडाला जाण्याचा निर्णय घेतला, तेव्हा तेथील सरकारने व्हिसा नाकारला. यादरम्यान ती कॅनडाची भाषा शिकत तेथील नोकरीच्या शोधात होती. एक वर्षाच्या प्रयत्नांनंतर तिला एका कंपनीत नोकरी आणि कामाचा परवानाही मिळाला.

कॅनडात काहीसा वर्णभेद असल्याने आपल्याला त्या देशाने व्हिसा नाकारल्याची सल तिच्या मनात होती. त्यामुळे खासगी नोकरीवर समाधान न मानता तिने काही कोर्सेस करून कॅनडातील स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला. त्यात यश मिळवत ती ५ जून रोजी कॅनडा सरकारच्या अन्न सुरक्षा निरीक्षकपदी रुजू झाली. फूड टेक्नॉलॉजीमधूनही परदेशात उच्च पद मिळू शकते, हे तिने दाखवून दिले.



## 'पानकंद'चे घेणार पेटंट

कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात शिक्षण घेत असताना मेघाने मगई आणि कलकत्ता पानाच्या टाकाऊ देठांपासून गुलकंदासारखा 'पानकंद' हा पदार्थ बनवला. त्यामुळे पानाच्या देठांचाही उपयोग होऊ लागला. त्याला लवकरच पेटंटही मिळेल.

> जिद्द आणि इच्छाशक्ती असेल तर कोणत्याही यशाला गवसणी घालता येते. परिस्थिती कोणत्याही यशाच्या आड येत नाही.
> — मेघा वाईंगडे-शिंदे.

जनसंपर्क कक्ष
20 JUN 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी अभ्यासक्रमासाठी १४ हजार विद्यार्थी



शिवाजी विद्यापीठातून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षेअंतर्गत १४ हजार २०५ विद्यार्थी उपस्थित होते. आजअखेर ५६ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत.

विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षा सुरू असून सोमवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ कॉमर्स, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग, बॅचलर ऑफ ॲग्रीकल्चर, मास्टर ऑफ काम्प्युटर ॲप्लिकेशन, मास्टर ऑफ आर्टस् (भूगोल), बी.एस्सी., एम.एस्सी. (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी), मास्टर ऑफ लॉ, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन आदी १९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. दरम्यान, एम.टेक., व्ही.बी.डी.एस., बी.व्होक (ऑटोमोबोईल), प्रिंटिंग अँड पब्लिकेशन, बँक मॅनेजमेंट आदी १७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले. भरारी पथकाकडून दोन २६ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे.